कला अकादमी गोवा



# पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती
# भजन स्पर्धा २०१९-२०



भजनसम्राट

# पं. मनोहरबुवा शिरगांवकर

# पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती भजन स्पर्धा २०१९-२०

गोव्याच्या समृध्द अशा भजन परंपरेला उत्तेजन देण्याच्या उद्देशाने दरवर्षी भजन स्पर्धा घेण्याची योजना अकादमी कार्यान्वित करते. याव्दारे राज्यातील पारंपारिक भजने सादर करणारी दर्जेदार पथके निवडण्यास मदत होते. त्याचबरोबर ग्रामीण व नागरी भागातील पारंपारिक भजन पथकांना प्रतिनिधिक स्वरुपात एक समान व्यासपीठ उपलब्ध होते. ग्रामिण भागातील कलाकारांना विभागीय व राज्यपातळीवर आपली कलाभिव्यक्ती सादर करता येते. संधी येईल तेव्हा राज्यस्तरीय सादरीकरणाबरोबरच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक कार्यक्रमात अशा भजन पथकांना स्थान देऊन गोव्याचे सांस्कृतिक प्रतिनिधित्व अधिक परिणामकारकरितीने करण्यास या स्पर्धेची मदत होते. भजनाने समाज पुरुषाचे सांस्कृतिक पोषण आणि प्रबोधन केले आहे. हे ध्यानात घेऊन सदर आयोजनाचा उपक्रम कला अकादमीने हाती घेतला आहे.

ही स्पर्धा पुरुष, महिला तसेच बाल कलाकारांसाठी विभागीय व राज्य अशा दोन स्तरावर घेण्यात येईल. या स्पर्धेचे सर्वसाधारण नियम व अटी पुढीलप्रमाणे आहेतः-

१. स्थानिक वृत्तपत्रांतून प्रसिध्दी देऊन स्पर्धेसाठी निर्धारित नमुन्यात प्रवेश अर्ज मागविण्यात येतील. मात्र सदर प्रवेशिका स्विकारण्याचा वा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार कला अकादमीकडे राहील.

२. ही स्पर्धा फक्त गोव्यातील भजनी कलाकारांसाठी असून गोव्यातील कोणत्याही पथकाला या स्पर्धेत सहभागी होता येईल.

३. एखाद्या कलाकाराने एकापेक्षा अधिक पथकांतून या स्पर्धेत भाग घेतला तर त्याने भाग घेतलेली सर्व पथके स्पर्धेतून बाद ठरतील.

**४. गावोगावी कायम स्वरुपात भजन मंडळे कार्यरत व्हावीत हा कला अकादमीच्या भजन स्पर्धेचा मूळ हेतू असल्याने भजनी पथकात संबंधित ग्रामपंचायत किंवा नगरपालिका क्षेत्रातील कलाकारांचाच समावेश करणे बंधनकारक आहे. एखाद्या संगीत विद्यालयास अथवा संगीत वर्गाचे पथक सहभागी होत असल्यास त्या संगीत विद्यालयास अथवा वर्गास हाच नियम लागू होईल.**

**मात्र, महिला व बाल पथकांना त्यांची अडचण लक्षात घेऊन फक्त साथी कलाकार (पखवाज व संवादिनी) यांच्या ग्रामपंचायत किंवा नगरपालिका क्षेत्राबाहेरील परंतू संबंधित तालुक्यातीलच घेण्याची मुभा असेल. अर्थात त्यांचा पारितोषिकांसाठी विचार केला जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत तालुक्याबाहेरील कलाकारांचा आपल्या पथकात समावेश करता येणार नाही.**

५. कोणत्याही पथकाला गोव्यातील मान्यवर कलाकारांचे मार्गदर्शन घेण्याची मुभा राहील.

६. गोमंतकीय पारंपारिक भजनाची निवड लक्षात घेऊन प्रत्येक पथकाला कमीत कमी ३० मिनिटे भजन सादर करणे बंधनकारक राहील. सादरीकरणासाठी जास्तीत जास्त ३५ मिनिटे या वेळी देण्यात येतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत या कालमर्यादेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता पथकानी घ्यावी. भजन सादरीकरणात सुरवातीचा 'गजर' सादर करण्यासाठी जास्तीत जास्त १२ मिनिटे देण्यात येतील व उर्वरित कालावधीत पहिला व दुसरा अभंग तसेच गवळण अथवा भारुडगायन सादर करावे लागेल.

७. स्पर्धेत सहभागी होणारी अनेक पथके त्याच कलाकारांना घेऊन तीच भजने, अभंग त्याच पध्दतीने स्पर्धेत सादर करताना दिसतात. त्यामुळे दरवर्षीच्या अशा पथकांच्या सादरीकरणात तोच-तोचपणा आणि एकसूरीपणा भजनप्रेमींना अनुभवावा लागतो. स्पर्धेच्या दर्जात्मक गुणवत्तेच्या दृष्टीनेही हे अनिष्ट असल्याकारणाने असे प्रकार सर्वच स्पर्धक पथकांनी टाळणे आवश्यक आहे. गेल्या दोन वर्षात सादर न केलेले अभंग स्पर्धक संस्थांनी या स्पर्धेसाठी निवडावेत व अधिक दर्जेदार आणि नाविन्यपूर्ण सादरीकरण प्रेक्षकांना अनुभवता यावे अशी दक्षता घ्यावी. त्यामुळे मागील भजनाचीच पुनरावृत्ती केल्याची इतर संस्थांनी पुराव्यासकट तक्रार केल्यास त्याची खातरजमा करुन निकाल तयार करताना परीक्षक या मुद्याचा निश्चित विचार करतील. हे ध्यानात घेऊन पूर्वी न गायलेले अभंग/भजने स्पर्धेत सादर करावीत. काही कलाकार दरवर्षी पथके बदलून तेच तेच अभंग गातात यांनाही हा नियम लागू पडतो हे ध्यानी घ्यावे.

८. सदर स्पर्धेतील पारंपारिक हौशी कलाकारांवर अन्याय होऊ नये या हेतूने व्यावसायिक कलाकारांच्या सहभागावर प्रतिबंध राहील. व्यावसायिक कलाकारांच्या सहभागासंबंधीचा कोणताही आक्षेप स्पर्धक पथकांकडून संबंधित सत्र संपण्याअगोदर लेखी स्वरुपात कला अकादमीच्या प्रतिनिधीकडे देणे आवश्यक आहे. यासंदर्भातील परीक्षकांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहील.

**कला व संस्कृती संचालनालयातर्फे शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये नेमणूक करण्यात आलेले संगीत प्रशिक्षक तसेच बालभवन व कला अकादमीच्या संगीत केंद्र संगीत शिक्षकांना या स्पर्धेत सहभागी होता येईल. मात्र कला अकादमीच्या भजन स्पर्धेत एकदा परीक्षणाची जबाबदारी सांभाळल्यानंतर स्पर्धक कलाकार म्हणून सहभागी होता येणार नाही. यापूर्वी अकादमीच्या भजन स्पर्धेत परीक्षक म्हणून काम पाहिलेल्यांनाही हा नियम लागू होईल.**

९. प्राचीन भजनातील वाद्य साथीच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेला पखवाज, साथीसाठी आवश्यक ठरविण्यात आला असून तबलासाथ परंपरेच्या दृष्टीने ग्राह्य धरण्यात येणार नाही. भजनात प्राचीन भजने, वारकरी भजने, अभंग संतांच्या रचना यांबरोबरच नवीन, सांगितिकदृष्ट्या सर्जनशील अभंग रचनांचा समावेश करता येईल. परंतु अशा रचनातील ईश्वर भक्ती परंपरा व सांगितिक सर्जनशीलता प्रामुख्याने अपेक्षित आहे.

१०. स्पर्धक पथकाला कमीत कमी १० व जास्तीत जास्त १६ कलाकारांचा समावेश करणे आवश्यक आहे. पारंपारिक सुरुवात व पहिला अभंग एका कलाकाराला म्हणता येईल. उर्वरित किमान दोन अभंग दोन स्वतंत्र कलाकारांनी सादर करणे आवश्यक आहे. भजन सादरीकरणात अभंग गायन सादर करताना आवर्तन घेणे परंपरेनुसार आवश्यक आहे. त्यासाठी फक्त पुरुष कलाकार भजन स्पर्धेत तिन्ही गायक कलाकारांना एकमेकांच्या अभंग गायनात आवर्तन घेऊन गायन सादरीकरण करावे लागेल. जेणेकरुन सादरीकरणात नाविन्यता येऊन भजन गायकीचा कस रसिक श्रोत्याना अनुभवता येईल. पुरुष कलाकार भजन स्पर्धेत आवर्तन घेऊन भजन गायकी सादर करणे स्पर्धेच्या नियमानुसार प्रत्येक पुरुष कलाकार भजन पथकावर बंधनकारक आहे. या नियमाचे उल्लंघन पुरुष कलाकार पथकानी केल्यास तो नियमभंग असे ग्राह्य धरुन सदर पथक पारितोषिकासाठी पात्र ठरणार नाही याची संबंधित स्पर्धक पथकांनी नोंद घेणे आवश्यक आहे. **आवर्तन घेण्याच्या या नियमातून महिला व बाल कलाकार भजन पथकांना सूट देण्यात आली आहे.**

११. सुरुवातीला ही स्पर्धा पुरुष, महिला व बाल कलाकारांसाठी विभागीय पातळीवर घेण्यात येईल. विभागीय स्पर्धेतील प्रथम व व्दितीय पारितोषिक विजेत्या पथकांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात येईल. राज्यस्तरावर निवड झालेल्या पथकांना आपले मुख्य कलाकार बदलता येणार नाहीत. साथी कलाकारांसाठी हाच नियम लागू होईल.

१२. विभागीय पातळीवर भजनस्पर्धा पाच/सहा अथवा आवश्यकतेनुसार योग्य वाटेल तेवढया केंद्रातून घेण्यात येईल. आयोजनातील सुकरता ध्यानात घेऊन आवश्यक वाटेल तेवढया सत्रांतून प्रत्येक केंद्राची विभागणी करण्यात येईल. अकादमीला अपेक्षित असलेल्या सुविधा ध्यानात घेऊन ह्या सत्रांच्या जागा निश्चित करण्यात येतील. प्रत्येक केंद्रावर कमीत कमी १६ व जास्तीत जास्त २५ पथकांचा समावेश केला जाईल. परंतू आयोजनाच्या दृष्टीने आवश्यक वाटल्यास सदर पथकसंख्या कमी अथवा जास्त करण्याचा संपूर्ण अधिकार कला अकादमीला राहील. संबंधित सत्रांनुसार स्पर्धेत सर्व कलाकार व साधनांसहित निर्धारित वेळेवर संबंधित केंद्रावर उपस्थित राहून सहभागी होण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित पथकांवर राहील. निर्धारित वेळेवर संबंधित केंद्रावर सर्व कलाकारांसह उपस्थित राहून ठरलेल्या कार्यक्रमांनुसार भजन सादर करणे हा गुणवत्तेचा निकष मानण्यात येईल.

**१३. निर्धारित वेळेत कला अकादमीकडे आलेल्या प्रवेश अर्जांची छाननी करुन विभागीय पातळीसाठी केंद्रवार व सत्रांचा तपशील देऊन स्पर्धेचा सविस्तर कार्यक्रम कला अकादमीकडून जाहीर करण्यात येईल. त्यानुसार संबंधित पथकाला स्पर्धेचे संबंधित सत्र सुरु होण्याच्या किमान तीस मिनीटे अगोदर स्पर्धास्थळी उपस्थित राहावे लागेल. विभागीय स्तरावर देखील चिठ्ठया टाकुन अनुक्रम ठरविले जातील. त्यामुळे प्रत्येक केंद्रावर पथक प्रमुखासोबत सर्व कलाकारांनीही हजर राहणे आवश्यक आहे. स्पर्धेच्या सादरीकरण क्रमांकानुसार स्पर्धेत भजन सादर करण्याची जबाबदारी पथकावर राहील. सादरीकरणाचा अनुक्रम न पाळणा-या पथकांना भजन सादरीकरण करु दिले जाणार नाही व सदर पथक स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल याची दखल सर्व पथकांनी गंभीरपणे घेणे आवश्यक आहे.**

१४. राज्यपातळीवरील स्पर्धा कला अकादमीला योग्य वाटेल त्या ठिकाणी व आवश्यक वाटेल तितक्या सत्रांतून घेण्यात येईल. या स्पर्धेत निर्धारित वेळेवर उपस्थित राहून चिठ्ठया टाकून ठरविलेल्या निर्धारित अनुक्रमांनुसार सहभागी होण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित पथकांवर राहील.

१५. प्रत्येक पथकाला आपली आवश्यक साधने स्वखर्चाने सोबत आणावी लागतील.

१६.विभागीय व राज्यस्तरीय भजनस्पर्धेचा निकाल तयार करण्यासाठी कला अकादमीकडून प्रत्येक केंद्रासाठी एक परिक्षक मंडळ नेमण्यात येईल. सदर परीक्षक मंडळ स्पर्धेतील प्रत्येक पथकाच्या सादरीकरणाचे मूल्यमापन करुन आपला निर्णय निर्धारित

नमुन्यात कला अकादमीकडे देतील. सदर निर्णय कला अकादमीकडून आवश्यक कार्यालयीन सोपस्कार पूर्ण झाल्यावर जाहीर करण्यात येईल व तो सर्वांवर संपूर्णपणे बंधनकारक राहील. **निकालासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. या नियमाचे उल्लंघन करुन निकालासंदर्भात तक्रारवजा पत्रव्यवहार करणा-या अथवा निकालावर सार्वजनिक माध्यमांतून टीका अथवा आलोचना करणा-या सहभागी पथकास पुढील दोन वर्षे स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.**

१७. महिलांच्या पथकांत मुख्य कलाकारांसह सर्व सहकलाकार महिलाच असणे आवश्यक आहे. मात्र संवादिनी (हार्मोनियम) व पखवाज साथीसाठी पुरुष कलाकार/बालकलाकार घेण्यास मुभा राहील. तसेच बालकलाकार पथकात संवादिनी (हार्मोनियम) व पखवाजसाथीसाठी आवश्यकता असल्यास प्रौढ कलाकार घेण्याची मुभा राहील. मात्र वाद्यसाथीच्या पारितोषिकासाठी बाल अथवा महिला साथी कलाकारांचाच संबंधित विभागात विचार केला जाईल.

**१८. विभागीय व राज्यस्तरावरील स्पर्धेत सहभागी झालेल्या भजनी कलाकारांना महिलांसाठीच्या तसेच बालकलाकारांच्या भजनस्पर्धेत वेगळे सहभागी होता येणार नाही. भजनी कलाकारांना कोणत्याही एक विभागातूनच (पुरुष, महिला अथवा बाल) पथकात सहभागी होता येईल. बाल कलाकारांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १६ वर्षे वयाची मर्यादा असून स्पर्धेची प्रवेशिका सादर करण्याच्या अंतिम दिवशी १६ वर्षाखालील वय असलेल्या कलाकारांना बाल कलाकार स्पर्धेत सहभागी होता येईल तसेच सदर दिवशी १६ वर्षे पूर्ण केलेल्या कलाकारास पुरुष/महिला भजन स्पर्धेतच सहभागी व्हावे लागेल.**

१९. विभागीय स्तरावरील प्राथमिक फेरीतील स्पर्धक पथकांना रु.५००/-(रुपये पाचशे मात्र) व राज्यस्तरावरील अंतिम फेरीतील पथकांना रु. १०००/- (रुपये एक हजार मात्र) वाद्यदुरुस्ती अन्य पूर्वतयारी इत्यादी संदर्भातील खर्च म्हणून देण्यात येतील. तसेच अकादमीच्या नियमानुसार वेगळा प्रवासखर्च देण्यात येईल.

२०. विभागीय व राज्यपातळीवरील विजेत्यांना पारितोषिक रकमेचे धनादेश व प्रमाणपत्रे देण्यात येतील. (कृपया पारितोषिकांचा तक्ता पृष्ठ क्र. ११ ते १३ वर पाहावा) विभागीय तसेच राज्यस्तरावरील सांघिक पारितोषिकांच्या रकमेचे धनादेश संबंधित पथकाच्या नावानेच काढण्यात येतील याची सर्व पथकानी नोंद घेणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक पथकाने आपली खाती कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा सहकारी बँकेत खोलणे आवश्यक

आहे. स्पर्धेच्यावेळी दिला जाणारा वाद्यदुरुस्ती व पूर्वतयारीचा खर्च तसेच प्रवासखर्च मात्र संबंधित पथकांतील अधिकृत व्यक्तीलाच देण्यात येईल.

**स्पर्धक पथकांनी पथकाचे तसेच प्रमुख कलाकारांची नावे (गायक व वादक) बँक खात्यानुसार संबंधित तक्त्यांत/प्रवेशिका अर्जात इंग्रजीत नमूद करणे आवश्यक आहे. विजेत्या पथकांचे तसेच वैयक्तिक पारितोषिक विजेत्यांचे धनादेश त्यानुसारच काढण्यात येतील. त्यामुळे प्रत्येक पथकाने संबंधित नावे देताना योग्य ती काळजी घ्यावी. धनादेश बदलून देण्यासंबंधात कोणतीही विनंती कला अकादमी मान्य करणार नाही याची नोंद सर्व स्पर्धक पथकांनी घ्यावी. तसेच धनादेश वैध मुदतीत न वटविल्यास नव्याने धनादेश देण्याची जबाबदारी कला अकादमीवर राहणार नाही.**

२१. स्पर्धेतील भजन सादरीकरणाचे मूल्यमापन करताना पारंपारिक सुरुवात व शेवट गायन-सुरेलपणा, ताल-लयबध्दता, संगीतसाथ, पारंपारिकता, मूलभूत गुणदर्शन, संतरचनांचे सर्जनशील सादरीकरण, अंतिम परिणाम, पथकाचा वक्तशीरपणा इत्यादी मुद्दे विचारात घेतले जातील. मात्र सादरीकरणाच्या मूल्यमापनाचा विचार तुकडयातुकडयाने केला जाणार नाही. गायन, वादन, तालबध्दता यासहित एकूण सादरीकरणाचे मूल्यमापन केले जाईल. सादरकर्त्या पथकांनी पृष्ठ क्र. ८ असलेल्या गुणतक्ता/गुणपत्रिका नमुन्याची माहिती करुन घ्यावी.

२२. भजन सादरीकरण करताना संबंधित गायक कलाकाराने शक्य तो टाळ खाली ठेऊन गाण्याचे टाळावे. परिक्षणाच्या वेळी हा मुद्दा विचारात घेतला जाईल.

**२३.स्पर्धेत सहभागी होणा-या प्रत्येक कलाकाराकडे सक्षम प्राधिकारीणीने दिलेले अधिकृत ओळखपत्र अथवा तत्सम/समकक्ष दस्तावेजाची प्रत सोबत असणे आवश्यक आहे. बाल कलाकारांसाठी आधार ओळखपत्र तसेच पुरुष व महिला कलाकारांसाठी मतदार ओळखपत्र/निवासी दाखला प्राधान्यक्रमाने ग्राह्य धरण्यात येईल. त्यामुळे सर्व कलाकारांची वैध/अधिकृत ओळखपत्रे स्पर्धास्थळी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पथक प्रमुखाची राहील.**

**२४. विभागीय/राज्यस्तरावर स्पर्धेतील सहभागी पथकातील प्रत्येक कलाकार हा ग्रामपंचायत किंवा नगरपालिका क्षेत्राबाहेरील असल्याची तक्रार दाखल झाल्यास संबंधित पथकप्रमुखाने सदर कलाकारांचे सक्षम प्राधिकारीणीने दिलेले अधिकृत ओळखपत्र अथवा तत्सम/समकक्ष दस्तावेजाची प्रत निकाला अगोदर अकादमीच्या स्पर्धा प्रतिनिधीच्या मागणीनुसार सादर करणे बंधनकारक आहे. मात्र कोणत्याही पथकांना अशा स्वरुपाची**

**तक्रार ही संबंधित केंद्रावरील शेवटचे सादरीकरण संपण्यापूर्वी लेखी स्वरुपात तपशीलवार अकादमीच्या प्रतिनिधीकडे देणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या तक्रारीचा कोणताही विचार केला जाणार नाही याची सर्व पथकांनी नोंद घ्यावी.**

२५. कोणत्याही पथकाला कला अकादमीच्या पूर्व समंतीविना ऐनवेळी स्पर्धेतून माघार घेता येणार नाही. तशी अधिकृत स्वरुपात आगाऊ कल्पना न देता ऐनवेळी माघार घेतल्यास संबंधित पथकाला पुढील वर्षीच्या स्पर्धेसाठी बाद ठरविण्यात येईल.

२६. विभागीय तसेच राज्यस्तरीय भजन स्पर्धेची कार्यवाही चालू असताना कोणत्याही स्वरुपाचा हेतुपुरस्सरपणे अडथळा आणण्याचा प्रयत्न केल्याचे अकादमीच्या निदर्शनास आल्यास संबंधित पथकाला तसेच त्यात सहभागी झालेल्या कोणत्याही कलाकाराला भजन स्पर्धेतून तसेच अकादमीच्या इतर स्पर्धा व महोत्सवातून भाग घेण्यास पुढील तीन वर्षाकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

२७. या नियमांसंबधी कोणत्याही मुद्यावरील कला अकादमीचा निर्णय अंतिम व संबंधितांवर बंधनकारक राहील. निकालासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२८. स्पर्धक पथकांनी भजन स्पर्धेच्या वरील कोणत्याही नियमांचे उल्लंघन केल्याचे सिध्द झाल्यास नियमभंग झाल्याचे ग्राह्य धरुन सदर पथकास व त्यातील कलाकारांस पुढील दोन वर्षे स्पर्धेत भाग घेण्यास बंदी राहील.

२९. या नियमांत कोणत्याही क्षणी व कुठल्याही टप्प्यावर फेरफार करण्याचा अधिकार कला अकादमीने राखून ठेवला आहे व असा फेरफार केल्यास तो सर्व संबंधितांवर बंधनकारक आहे.

************

# कला अकादमी गोवा

## पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती भजन स्पर्धा २०१९-२०

### पुरुष / महिला / बाल कलाकार

गुणपत्रिका नमुना

केंद्र क : सत्र क : स्थळ:
दिनांक: / /२०१९

| अनुक्रम | पथकाचे नाव | पारंपारिक सुरुवात गायन, तालबध्दता, समूहसाथ, पारंपारिकता, प्रयोगशिलता, कालमर्यादा इ. | पहिला अभंग सुरेलपणा, तालबध्दता, आवाजाचा लगाव चालीतील नाविन्य, भावपूर्णता | दुसरा अभंग सुरेलपणा, तालबध्दता, आवाजाचा लगाव चालीतील नाविन्य, भावपूर्णता, आत्मविश्वास | गवळण/भारुड नाविन्यता, नाट्यमयता, भावपूर्णता, तालबध्दता, सुरेलपणा | एकूण गुण | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २५ | २५ | २५ | २५ | १०० | |

कला अकादमी गोवा

## पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती भजन स्पर्धा २०१९-२०

### पुरुष कलाकार / महिला कलाकार / बाल कलाकार

### स्पर्धक पथकाने पुरवायच्या माहितीचा नमुना

१. पथकाचे नावः------------------------------------------

------------------------------ दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.--------------------

Name as per Bank Account (in English)----------------------------------------

(बँक खात्यानुसार पथकाचे नांव इंग्रजीत नमूद करावे)

प्रथम गायक कलाकाराचे नावः ------------------------------------------

Name as per Bank Account (in English) ----------------------------------------

(बँक खात्यानुसार प्रथम गायकाचे नांव इंग्रजीत नमूद करावे)

पहिला अभंग : (अभंगाचे शब्द देण्यात यावे) ----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

दुसरा अभंग गायक कलाकाराचे नावः ----------------------------------------

Name as per Bank Account (in English) ----------------------------------------

(बँक खात्यानुसार व्दितीय गायकाचे नांव इंग्रजीत नमूद करावे)

दुसरा अभंग व त्याचे शब्दः ----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

गवळण/भारुड गायक कलाकाराचे नावः----------------------------------------

Name as per Bank Account (in English) ----------------------------------------

(बँक खात्यानुसार गवळण गायकाचे नांव इंग्रजीत नमूद करावे)

गवळण/भारुड व त्याचे शब्दः ----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

**पखवाजसाथीः** -----------------------------------------------

Name as per Bank Account (in English) -----------------------------------

(बँक खात्यानुसार नांव इंग्रजीत नमूद करावे)

**✱ ग्रामपंचायत/नगरपालिका क्षेत्राबाहेरील असल्यास स्पष्ट नमुद करावे** ----------------------

**संवादिनीसाथीः** -----------------------------------------------

Name as per Bank Account (in English)-----------------------------------

(बँक खात्यानुसार नांव इंग्रजीत नमूद करावे)

**✱ ग्रामपंचायत/नगरपालिका क्षेत्राबाहेरील असल्यास स्पष्ट नमुद करावे** ----------------------

साथी कलाकार

१. ----------------------- ६. -----------------------

२. ----------------------- ७. -----------------------

३. ----------------------- ८. -----------------------

४. ----------------------- ९. -----------------------

५. ----------------------- १०. -----------------------

**वरील माहिती खरी असून ती परीक्षकांच्या माहितीसाठी पुरविण्यात येत आहे. तसेच गेल्या दोन वर्षीच्या भजनस्पर्धेत आमच्या पथकाने सादर केलेल्या अभंगांची पुनरुक्ती आमच्या पथकातील कलाकारांनी यावर्षीच्या स्पर्धेत केलेली नाही. त्याचप्रमाणे स्पर्धेचे सर्व नियम व अटी आमच्या पथकाने अवगत करुन घेतल्या असून त्या पाळण्याची आमचे पथक हमी देत आहे. तसेच नियम क्र. २३ नुसार पथकातील सर्व कलाकारांची वैध/अधिकृत ओळखपत्रे स्पर्धास्थळी उपलब्ध करुन देण्याची हमी आम्ही देत आहोत.**

**पथकप्रमुखाचे नाव व सही**

**टीप १: महिला व बालकलाकार पथकांनी ग्रामपंचायत/नगरपालिका क्षेत्राबाहेरील महिला/बाल साथी कलाकार घेतल्यास संबधित कलाकारांच्या नावापुढे "ग्रामपंचायत/नगरपालिका क्षेत्राबाहेरील" असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.**

**टीप २: सदर नमुन्यातील चार प्रती तयार करुन स्पर्धेच्या प्रारंभी अकादमीच्या प्रतिनिधीकडे देणे आवश्यक आहे.**

कला अकादमी गोवा

## पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती भजन स्पर्धा २०१९-२०

## भजन सादरीकरणाची पारितोषिके-विभागीय स्तर (बाल कलाकार)

| | |
|---|---|
| प्रथम | रू. ५०००/- |
| व्दितीय | रू. ३०००/- |
| तृतीय | रू. २०००/- |
| उत्तेजनार्थ | रू. १०००/-ची तीन पारितोषिके |

**वैयक्तिक पारितोषिके**

| | |
|---|---|
| उत्कृष्ट गायक कलाकार (पहिला अभंग) | रू. १०००/- |
| उत्कृष्ट गायक कलाकार (दुसरा अभंग) | रू. १०००/- |
| उत्कृष्ट गवळण/भारुडगायक | रू. १०००/- |
| उत्कृष्ट पखवाजसाथी | रू. १०००/- |
| उत्कृष्ट संवादिनीसाथी | रू. १०००/- |

---

## भजन सादरीकरणाची पारितोषिके-विभागीय स्तर (महिला कलाकार)

| | |
|---|---|
| प्रथम | रू. ७०००/- |
| व्दितीय | रू. ५०००/- |
| तृतीय | रू. ३०००/- |
| उत्तेजनार्थ | रू. २०००/-ची तीन पारितोषिके |

**वैयक्तिक पारितोषिके**

| | |
|---|---|
| उत्कृष्ट गायक कलाकार (पहिला अभंग) | रू. १५००/- |
| उत्कृष्ट गायक कलाकार (दुसरा अभंग) | रू. १५००/- |
| उत्कृष्ट गवळण/भारुडगायक | रू. १५००/- |
| उत्कृष्ट पखवाजसाथी | रू. १५००/- |
| उत्कृष्ट संवादिनीसाथी | रू. १५००/- |

## पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती भजन स्पर्धा २०१९-२०

### भजन सादरीकरणाची पारितोषिके–विभागीय स्तर (पुरुष कलाकार)

| | |
|---|---|
| प्रथम | **रु. ९०००/-** |
| व्दितीय | **रु. ७०००/-** |
| तृतीय | **रु. ५०००/-** |
| उत्तेजनार्थ | **रु. ३०००/-**ची तीन पारितोषिके |

**वैयक्तिक पारितोषिके**

| | |
|---|---|
| उत्कृष्ट गायक कलाकार (पहिला अभंग) | **रु. २०००/-** |
| उत्कृष्ट गायक कलाकार (दुसरा अभंग) | **रु. २०००/-** |
| उत्कृष्ट गवळण/भारुडगायक | **रु. २०००/-** |
| उत्कृष्ट पखवाजसाथी | **रु. २०००/-** |
| उत्कृष्ट संवादिनीसाथी | **रु. २०००/-** |

---

## पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती राज्यस्तरीय भजन स्पर्धा २०१९-२०

### भजन सादरीकरणाची पारितोषिके (बाल कलाकार)

| | |
|---|---|
| प्रथम | **रु. २५,०००/-** |
| व्दितीय | **रु. २०,०००/-** |
| तृतीय | **रु. १५,०००/-** |
| चौथे | **रु. १०,०००/-** |
| उत्तेजनार्थ | **रु. ५,०००/-**ची दोन पारितोषिके |

**वैयक्तिक पारितोषिके**

| | |
|---|---|
| उत्कृष्ट गायक कलाकार (पहिला अभंग) | **रु. २०००/-** |
| उत्कृष्ट गायक कलाकार (दुसरा अभंग) | **रु. २०००/-** |
| उत्कृष्ट गवळण/भारुडगायक | **रु. २०००/-** |
| उत्कृष्ट पखवाजसाथी | **रु. २०००/-** |
| उत्कृष्ट संवादिनीसाथी | **रु. २०००/-** |

-----------

एकूण **रु. ९०,०००/-**

# पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती राज्यस्तरीय भजन स्पर्धा २०१९-२०

## भजन सादरीकरणाची पारितोषिके (महिला कलाकार)

| | |
|---|---|
| प्रथम | रु. ३५,000/- |
| व्दितीय | रु. ३0,000/- |
| तृतीय | रु. २५,000/- |
| चौथे | रु. २0,000/- |
| उत्तेजनार्थ | रु. १0,000/-ची दोन पारितोषिके |

**वैयक्तिक पारितोषिके**

| | | |
|---|---|---|
| उत्कृष्ट गायक कलाकार (पहिला अभंग) | प्रथंम | रु. २000/- |
| | व्दितीय | रु. १000/- |
| उत्कृष्ट गायक कलाकार (दुसरा अभंग) | प्रथंम | रु. २000/- |
| | व्दितीय | रु. १000/- |
| उत्कृष्ट गवळण/भारुडगायक | प्रथम | रु. २000/- |
| | व्दितीय | रु. १000/- |
| उत्कृष्ट पखवाजसाथी | प्रथम | रु. २000/- |
| | व्दितीय | रु. १000/- |
| उत्कृष्ट संवादिनीसाथी | प्रथम | रु. २000/- |
| | व्दितीय | रु. १000/- |
| एकूण | | रु. १,४५,000/- |

---

## भजन सादरीकरणाची पारितोषिके (पुरुष कलाकार)

| | |
|---|---|
| प्रथम | रु. ७५,000/- |
| व्दितीय | रु. ५0,000/- |
| तृतीय | रु. ४0,000/- |
| चौथे | रु. ३0,000/- |
| उत्तेजनार्थ | रु. २0,000/-ची दोन पारितोषिके |

**वैयक्तिक पारितोषिके**

| | | |
|---|---|---|
| उत्कृष्ट गायक कलाकार (पहिला अभंग) | प्रथंम | रु. ५000/- |
| | व्दितीय | रु. ३000/- |
| उत्कृष्ट गायक कलाकार (दुसरा अभंग) | प्रथंम | रु. ५000/- |
| | व्दितीय | रु. ३000/- |
| उत्कृष्ट गवळण/भारुडगायक | प्रथम | रु. ५000/- |
| | व्दितीय | रु. ३000/- |
| उत्कृष्ट पखवाजसाथी | प्रथम | रु. ५000/- |
| | व्दितीय | रु. ३000/- |
| उत्कृष्ट संवादिनीसाथी | प्रथम | रु. ५000/- |
| | व्दितीय | रु. ३000/- |
| एकूण | | रु. २,७५,000/- |

कला अकादमी गोवा

# राज्यस्तरीय भजन स्पर्धेतील विजेती पथके
## (पुरुष कलाकार)

| स्पर्धा क्र. | वर्ष | प्रथम पारितोषिक विजेती पथके |
|---|---|---|
| १. | १९७९-८० | स्वरसंगम, सांगे |
| २. | १९८०-८१ | बलभीम भजनी मंडळ, आडपई, फोंडा |
| ३. | १९८१-८२ | महालक्ष्मी भजनी मंडळ, ताळगांव |
| ४. | १९८२-८३ | कमळेश्वर भजनी मंडळ, चोडण |
| ५. | १९८३-८४ | लईराई प्रासादिक भजनी मंडळ, शिरगांव |
| ६. | १९८४-८५ | स्वरब्रह्म, वास्को |
| ७. | १९८५-८६ | स्वस्तिक ड्रॅमॅटिक असोसिएशन, बेती, बार्देश |
| ८. | १९८६-८७ | देवकीकृष्ण भजनी मंडळ, माडेल-चोडण |
| ९. | १९८७-८८ | श्री मल्लिकार्जुन भजनी मंडळ, वाडी, मेरश |
| १०. | १९८८-८९ | श्री विजयदुर्गा संगीत विद्यालय, सांकवाळ |
| ११. | १९८९-९० | वीरहनुमान भजनी मंडळ, वाडी, मेरशी |
| १२. | १९९०-९१ | पालक शिक्षक संघ, गिरी |
| १३. | १९९१-९२ | गुरुनाथ भजनी मंडळ, रुमड-पाळी |
| १४. | १९९२-९३ | ब्रह्मानंद संगीत विद्यालय, हातुर्ली-मये |
| १५. | १९९३-९४ | मदनंत भजनी मंडळ, सावईवेरे |
| १६. | १९९४-९५ | स्वरअलंकार भजनी मंडळ, वास्को |
| १७. | १९९५-९६ | स्वरबहार भजनी मंडळ, वास्को |
| १८. | १९९६-९७ | अनंतसेवा भजनी मंडळ, सावईवेरे |
| १९. | १९९७-९८ | गोपाळकृष्ण भजनी मंडळ, चिंबल |
| २०. | १९९८-९९ | श्री सातेरी गांजेश्वरी भजनी मंडळ, शेळ,-मेळावली |
| २१. | १९९९-२००० | जय श्रीराम कला केंद्र, तिस्क-उसगांव |
| २२. | २०००-०१ | श्री साईदत्त भजनी मंडळ, बांदिवडे |
| २३. | २००१-०२ | श्री सत्यनारायण भजनी मंडळ, आमरखणे-केरी |
| २४. | २००२-०३ | माशेल कलाप्रेमी, माशेल |

| | | |
|---|---|---|
| २५. | २००३-०४ | मनोहारी भजनी मंडळ, पणजी |
| २६. | २००४-०५ | श्री शिवशंकर भजनी मंडळ, सावईवेरे |
| २७. | २००५-०६ | श्री शांतादुर्गा ब्रह्मदेव भजनी मंडळ, कारापुर |
| २८. | २००६-०७ | श्री खामिणी सांस्कृतिक मंडळ, सावईवेरे |
| २९. | २००७-०८ | श्री केळबाई भजनी मंडळ, कुडणे |
| ३०. | २००८-०९ | श्री दादामहाराज भजनी मंडळ, बांदिवडे |
| ३१. | २००९-१० | श्री शांतादुर्गा भजनी मंडळ, कवळे |
| ३२. | २०१०-११ | श्री दाडेश्वर भजनी मंडळ, नादोडा |
| ३३. | २०१२-१३ | सातेरी केळबाय बारावंश भजनी मंडळ, मोर्ले, सत्तरी |
| ३४. | २०१३-१४ | श्री सातेरी प्रासादिक भजनी मंडळ, बेतोडा |
| ३५. | २०१४-१५ | श्री शांतादुर्गा कला केंद्र, धारगळ |
| ३६. | २०१५-१६ | आकार, पैंगीण |
| ३७. | २०१६-१७ | श्री नागेशी महारुद्र भजनी मंडळ, कुडका |
| ३८. | २०१७-१८ | मुशेले कला मंडळ, वास्को |
| ३९. | २०१८-१९ | हॅप्पी स्पोर्ट्स क्लब, भजनी मंडळ, चिंबल |

## राज्यस्तरीय भजन स्पर्धेतील विजेती पथके (महिला कलाकार)

| स्पर्धा क्र. | वर्ष | प्रथम पारितोषिक विजेती पथके |
|---|---|---|
| १. | २०००-०१ | युवती भ.मं. अडकोण, बाणस्तारी |
| २. | २००१-०२ | युवती भ.मं. अडकोण बाणस्तारी |
| ३. | २००२-०३ | श्री केशवदेव भक्त महिला संघ फोंडा |
| ४. | २००३-०४ | स्वरसिध्दी संस्था, मोपा-पेडणे |
| ५. | २००४-०५ | श्री गुरुदेवदत्त भक्त महिला मं., म्हार्दोळ |
| ६. | २००५-०६ | युवती भ. मं. अडकोण, बाणस्तारी |
| ७. | २००६-०७ | श्री दत्तसेवा महिला भजनी मंडळ, खेडे, सावईवेरे |
| ८. | २००७-०८ | श्री मदनंत महिला भजनी मंडळ, सावईवेरे |
| ९. | २००८-०९ | श्री दत्तसेवा महिला भजनी मंडळ, खेडे, सावईवेरे |
| १०. | २००९-१० | युवती भ. मं. अडकोण, बाणस्तारी |
| ११. | २०१०-११ | श्री वनदेवी संगीत संस्था, कायसूव |

| | | |
|---|---|---|
| १२. | २०१२-१३ | केळबाय महिला भजनी मंडळ, कुडणे |
| १३. | २०१३-१४ | सप्तसूर सांस्कृतिक संगीत विद्यालय, नार्वे |
| १४. | २०१४-१५ | श्री सातेरी महिला भजनी मंडळ, मोले |
| १५. | २०१५-१६ | श्री कुळाचीमाया तेजोमय महिला मंडळ, केरी-सत्तरी |
| १६. | २०१६-१७ | आकार, पैंगीण |
| १७. | २०१७-१८ | भाविकादेवी महिला भजनी मंडळ, दिवाडी |
| १८. | २०१८-१९ | लोकरंग, कुडचडे |

---

## राज्यस्तरीय भजन स्पर्धेतील विजेती पथके (बाल कलाकार)

| स्पर्धा क्र. | वर्ष | प्रथम पारितोषिक विजेती पथके |
|---|---|---|
| १. | २००१-०२ | बालभवन केंद्र, मांद्रे |
| २. | २००२-०३ | बालभवन केंद्र मांद्रे |
| ३. | २००३-०४ | ॐ शिवशंभो बाल भजनी मं. वाडी-मेरशी |
| ४. | २००४-०५ | बालभवन केंद्र, काणकोण |
| ५. | २००५-०६ | न्यू इंग्लिश हायस्कूल, केरी-पेडणे |
| ६. | २००६-०७ | न्यू इंग्लिश हायस्कूल, केरी-पेडणे |
| ७. | २००७-०८ | स्वरतरंग बाल भजनी मंडळ, म्हापसा |
| ८. | २००८-०९ | मांद्रे हायस्कूल, मांद्रे |
| ९. | २००९-१० | ॐ शिवशंभो बाल भजनी मं. वाडी-मेरशी |
| १०. | २०१०-११ | ॐ शिवशंभो बाल भजनी मं. वाडी-मेरशी |
| ११. | २०१२-१३ | द न्यू एज्युकेशनल इंस्टिटयूट स्कुल,कुडचडे |
| १२. | २०१३-१४ | बालभवन, पणजी |
| १३. | २०१४-१५ | श्री श्रध्दानंद, विद्यालय, पैंगीण |
| १४. | २०१५-१६ | बालभवन, केरी-सत्तरी |
| १५. | २०१६-१७ | श्री सातेरी प्रसादिक संगीत संस्था, बेतोडा |
| १६. | २०१७-१८ | श्री सातेरी प्रसादिक संगीत संस्था, बेतोडा |
| १७. | २०१८-१९ | श्री सातेरी प्रसादिक संगीत संस्था, बेतोडा |

*************

कला अकादमी गोवा

# पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती भजन स्पर्धा २०१९-२०

## पुरुष कलाकार / महिला कलाकार / बाल कलाकार

## प्रवेशिका

१.पथकाचे नावः-------------------------------------------------

Name as per Bank Account (in English)----------------------------------------

(बँक खात्यानुसार पथकाचे नांव इंग्रजीत नमूद करावे)

२.विभागः **पुरुष कलाकार / महिला कलाकार / बाल कलाकर पथक** (संबंधित माहिती स्पष्ट लिहा)

---------------------------------------------------------------

३.स्थळः-------------------------------------------------------

४.ग्रामपंचायत/नगरपालिका क्षेत्रः---------------------------------- तालुकाः----------

५.पत्रव्यवहारासाठी पथकप्रमुखाचा पूर्ण पत्ताः------------------------------------

--------------------------------------------------------पिंनकोड

-------------

दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.(१)----------------------------क्र. (२)----------------

६.कलाकारांची नामावलीः

१.--------------------------------------------------प्रथम गायक कलाकार

--------------------------------------------------Name as per Bank Account

२.-----------------------------------------------दुसरा अभंग गायक कलाकार

--------------------------------------------------Name as per Bank Account

३.------------------------------------------------गवळण/भारुड गायक कलाकार

--------------------------------------------------Name as per Bank Account

४.--------------------------------------------------------पखवाजसाथी

(ग्रामपंचायत / नगरपालिका क्षेत्रातील / क्षेत्राबाहेरील)

--------------------------------------------------Name as per Bank Account

५.------------------------------------------------------संवादिनीसाथी

(ग्रामपंचायत / नगरपालिका क्षेत्रातील / क्षेत्राबाहेरील)

------------------------------------------------------Name as per Bank Account

६.------------------------------------------------------सहकलाकार

७.------------------------------------------------------सहकलाकार

८.------------------------------------------------------सहकलाकार

९.------------------------------------------------------सहकलाकार

१०.------------------------------------------------------सहकलाकार

११.------------------------------------------------------सहकलाकार

१२.------------------------------------------------------सहकलाकार

१३.------------------------------------------------------सहकलाकार

१४.------------------------------------------------------सहकलाकार

१५.------------------------------------------------------सहकलाकार

१६.------------------------------------------------------सहकलाकार

मी याव्दारे जाहीर करीत आहे की, आमच्या पथकातील सर्व कलाकारांनी भजन स्पर्धेचे संपूर्ण नियम व अटी अवगत करुन घेतलेल्या आहेत आणि त्या पाळण्याची संपूर्ण हमी या प्रवेश अर्जाव्दारे आम्ही देत आहोत. तसेच आमच्या केंद्रावर स्पर्धा सुरु होण्याच्या किमान अर्धा तास अगोदर सर्व तयारीनिशी उपस्थित राहणार तसेच अकादमीने जाहिर केलेला निकाल आमच्यावर बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे नियम क्र. ४ प्रमाणे आमच्या पथकातील सर्व कलाकार हे ग्रामपंचायत/नगरपालिका क्षेत्रातील आहेत. तसेच पखवाजसाथी/संवादिनीसाथी कलाकार ग्रामपंचायत/नगरपालिका क्षेत्रातील/क्षेत्राबाहेरील आहेत.

**नियम क्र. २३ प्रमाणे आमच्या पथकातील सर्व कलाकाराची वैध/अधिकृत ओळखपत्रे स्पर्धास्थळी उपलब्ध करुन देण्याचीही हमी आम्ही देत आहोत**

--------------------

**पथकप्रमुखाची स्वाक्षरी**

स्थळः-------------

नावः-----------------------------


दिनांकः------------

✻ महिला व बालकलाकार पथकांनी ग्रामपंचायत/नगरपालिका क्षेत्राबाहेरील महिला/बाल साथी कलाकार घेतल्यास संबधित कलाकारांच्या नावापुढे "ग्रामपंचायत/नगरपालिका क्षेत्राबाहेरील" असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.



हॅप्पी स्पोर्टस क्लब भजनी मंडळ, चिंबल

३९व्या राज्यस्तरीय पुरुष कलाकार भजन स्पर्धेतील विजेते पथक



लोकरंग, कुडचडे

१८ व्या राज्यस्तरीय महिला कलाकार भजन स्पर्धेतील विजेते पथक



श्री सातेरी प्रासादिक संगीत संस्था-बेतोडा

१७ व्या राज्यस्तरीय बाल कलाकार भजन स्पर्धेतील विजेते पथक

# ॥ रामकृष्णहरी ॥

कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रात व्यापक कार्य करण्याच्या उद्देशाने गोवा शासनाने स्थापन केलेली कला अकादमी गेली चार दशके सर्वव्यापी उपक्रम राबवित आहे. संगीत, नाटक, नृत्य, शिल्प, चित्र, साहित्य, लोककला आणि अन्य पारंपारिक कलांच्या जतन आणि संवर्धनाबरोबरच गोमंतकाच्या तळागळातील सर्वसामान्य कलाकार अकादमीशी जोडला जावा या उद्देशाने ही अकादमी विविध उपक्रमांचे सातत्याने आयोजन करीत आहे. भजन, कीर्तनासारख्या पारंपारिक कलांना लोकाश्रय आणि त्याचबरोबर राजाश्रय मिळवून देण्यासाठी कला अकादमीने महत्वपूर्ण असे योगदान दिलेले आहे.

भजनसम्राट पं. मनोहरबुवा शिरगांवकर यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येत असलेली भजन स्पर्धा म्हणजे गोमंतकाच्या सांस्कृतिक क्षेत्रातला एक महाजागर. गोमंतकातील हजारो भजनी कलाकार 'जय जय राम कृष्ण हरी'चा गजर करीत अपूर्व उत्साहात ज्यात सहभागी होतात अशी ही स्पर्धा. १९७९-८० सालापासून या भजन स्पर्धेला प्रारंभ झाला. सुरुवातीला पुरुष कलाकारापुरतीच ही स्पर्धा मर्यादीत होती. आता पुरुष, महिला व बाल अशी तीन गटात स्पर्धेचे आयोजन केले जाते, यातच या स्पर्धेचा लौकिक व लोकप्रियता सामावलेली आहे.....!!!

–कला अकादमी गोवा


**कला अकादमी गोवा, कांपाल -पणजी, गोवा ४०३००१ (भारत)**

**दुरध्वनी क्र. ०८३२-२४२०४५१/५२/५३/५४ फॅक्स- ०८३२-२४२०४५७**

**ईमेल: kalaacademygoa@yahoo.co.in वेबसाईट: kalaacademygoa.co.in**